# महाराष्ट्र विधानसभा

**तिसरे अधिवेशन, २०२४**

**सन २०२४-२५ च्या अतिरिक्त अर्थसंकल्पीय मागण्या**

**माननीय अध्यक्षांनी मान्य केलेल्या कपात सूचनांची यादी**

**शुक्रवार, दिनांक ५ जुलै, २०२४**

## नगर विकास विभाग

**कपात सूचनांची एकूण संख्या - ३९**

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | **मागणी क्रमांक: एफ-२**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २२१७, नगरविकास**<br>**रूपये:- १,०६,३९,५५,३८,०००/-**<br>**श्री. सहसराम कोरोटे** |
| (१) | ६४४६ | १० | आमगाव नगरपरिषद सन 2017 मध्ये स्थापन होऊन सदर नगरपरिषद क्षेत्र 8 गावे असून सदर गावांना कोणताही विकास न होऊन कोणतीही सोईसुविधा उपलब्ध नाहीत. नगरपरिषद निवडणूका न होणे, नगरपरिषदेवर प्रशासकाची नियुक्ती होणे, त्यामुळे तेथील स्थानिक लोकांना कोणत्याही विकास कामांचा व नगरपरिषदेच्या सुविधा न मिळणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. संजय जगताप** |
| (२) | ६४८७ | १० | सासवड नगरपरिषद, सासवड शहराची सन २०११ ची लोकसंख्या ३१८२१ इतकी असणे, सासवड शहरासाठी नगरपरिषदे मार्फत पाणीपुरवठा योजनेचा सविस्तर रक्कम रु. ८० कोटी इतका प्रस्ताव तयार करुन मंजुरीस्तव सादर करणेत आलेला असून महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागामार्फत तांत्रिक तपासणीचे काम प्रगतीत आहे. सदर प्रस्तावाचा महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियांनातर्गत समावेश करणे आवश्यक आहे याकरिता शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (३) | ६४९१ | १० | जेजुरी नगरपरिषद, जेजुरी शहराची सन २०११ चे जनगणनेनुसार लोकसंख्या १४५१५ इतकी आहे जेजुरी शहरासाठी नगरपरिषदे मार्फत पाणीपुरवठा योजनेचा सविस्तर रक्कम रु. १२५ कोटी इतका प्रस्ताव मंजुरीस्तव सादर करणेत आलेला असून महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागामार्फत तांत्रिक तपासणीचे काम करणेबाबत उक्त प्रस्तावाचा महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियांनांतर्गत समावेश करण्याकरिता शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (४) | ६४९३ | १० | पुणे महानगरपालिकेत समाविष्ठ झालेल्या गावांत नागरीकांकडून १०० टक्के कर आकारले जात असणे, परंतु सोयीसुविधा अपु-या दिली जात असल्याची भावना नागरीकांच्या मनामध्ये असणे, महानगरपालिका हद्दीतील हौसिंग सोसायटयांमध्ये एक दिवसा आड किंवा तीन दिवसा आड कमी दाबाने पाणी पुरवले जाणे, नागरीकांना टँकरद्वारे पाणी विकत घ्यावे लागत असणे, त्यामुळे नागरीकांना |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | आर्थिक व मानसिक त्रास सहन करावा लागत असल्याने त्यांच्यात पसरलेले असंतोषाचे वातावरण, याकरीता येथील गावांना सुरळीत पाणीपुरवठा होण्याकरीता शासनस्तरावरुन निधी उपलब्ध होण्यासाठी शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. विकास ठाकरे** |
| (५) | ६४१८ | १० | नागपूर येथील प्रभाग क्र. 11, गोरेवाडा येथे गोरेवाडा जलाशय संरक्षण भिंतीचे बांधकाम करणे अत्यंत गरजेचे आहे व सौंदर्यकरण करणे करणे ही गरजेचे आहे जेणेकरून सामान्य नागरिकांना तेथे फिरता येईल व तेथील स्थानिक दुकानदारांना रोजगार या संरक्षण भिंतीसाठी सुमारे 50 कोटी निधीची तरतूद करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (६) | ६४१९ | १० | नागपूर येथील प्रभाग क्र. 11 गोरेवाडा येथे सिमेंट रस्त्याचे बांधकाम करणे अत्यंत गरजेचे आहे रस्त्याची फार दुरावस्था झालेली आहे नागरिकांना या गोष्टीचा खूप त्रास होत आहे आणि सध्या त्या रस्त्यावर एक्सीडेंट चे प्रमाण वाढलेले आहे तरीही या रस्त्याचे बांधकाम करण्यासाठी सुमारे 150 कोटीची तरतूद करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (७) | ६४२० | १० | नागपूर येथील प्रभाग क्र.11 झिंगाबाई टाकळी येथे सिमेंट रस्त्याचे बांधकाम करणे अत्यंत गरजेचे आहे रस्त्याची फार दुरावस्था झालेली आहे नागरिकांना या गोष्टीचा खूप त्रास होत आहे आणि सध्या त्या रस्त्यावर एक्सीडेंट चे प्रमाण वाढलेले आहे तरीही या रस्त्याचे बांधकाम करण्यासाठी सुमारे 150 कोटीची तरतूद करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (८) | ६४२२ | १० | नागपूर येथील प्रभाग क्र. 11 , गोरेवाडा व झिंगाबाई टाकळी येथे मोकळ्या मैदानाचे विविध विकास कार्य करणे अत्यंत गरजेचे आहे तेथील स्थानिक नागरिकांना आणि लहान मुलांना खेळण्यासाठी जागा उपलब्ध नाही स्थानिक ज्येष्ठ नागरिकांना फिरण्यासाठी मैदान उपलब्ध नाही तरीही येथे विविध विकास कामे करण्यासाठी शासनाने 100 कोटीची तरतूद करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (९) | ६४२३ | १० | नागपूर येथील प्रभाग क्र. 11 दाभा येथे सिमेंट रस्त्याचे बांधकाम करणे अत्यंत गरजेचे आहे रस्त्याची फार दुरावस्था झालेली आहे नागरिकांना या गोष्टीचा खूप त्रास होत आहे आणि सध्या त्या रस्त्यावर एक्सीडेंट चे प्रमाण वाढलेले आहे तरीही या रस्त्याचे बांधकाम करण्यासाठी सुमारे 180 कोटीची तरतूद करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (१०) | ६४२५ | १० | नागपूर येथील प्रभाग क्र. 13, हजारीपाड येथे पावसाळी नालीचे बांधकाम करणे अत्यंत गरजेचे आहे पावसाळयामध्ये पाण्याचा प्रवाह वाढल्याने नालीतील पाणी लोकांच्या घरामध्ये शिरत आहे व लोकांच्या साधन संपत्तीचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत आहे व या नाली मध्ये पावसाळयात लोके वाहून जाण्याची शक्यता |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | आहे आणि काही मानव आणि होऊ नये याकरिता नालीचे बांधकाम करणे अत्यंत गरजेचे आहे तरीही या नळी चे बांधकाम करण्यासाठी सुमारे 5 कोटीची तरतूद करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (११) | ६४२६ | १० | नागपूर येथील प्रभाग क्र. 10, मानकापूर क्रीडा संकुल येथे विविध विकास कामे करणे अत्यंत गरजेचे आहे तेथील स्थानिक नागरिकांना आणि लहान मुलांना खेळण्यासाठी जागा उपलब्ध नाही स्थानिक ज्येष्ठ नागरिकांना फिरण्यासाठी मैदान उपलब्ध नाही तरीही येथे विविध विकास कामे करण्यासाठी तरीही ही विकास कामे करण्यासाठी सुमारे 30 कोटीची तरतूद करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना |
| (१२) | ६४२८ | १० | प्रभाग क्र. 10, पागलखाना हॉस्पिटल येथे विविध विकास काम करणे अत्यंत गरजेचे आहे तेथे नागरिकांच्या सुविधा साठी काहीच सुख सोयी उपलब्ध नाहीत तरीही तेथे सामान्य नागरिकांच्या सर्व सुखसोयी आणि गरजा पूर्ण करणे अत्यंत गरजेचे आहे तरीही या प्रसंगी जना आंदोलन उभारण्यासाठी हॉस्पिटल येथे विविध विकास कामे करण्यासाठी सुमारे 30 कोटीची तरतूद करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (१३) | ६४२९ | १० | नागपूर येथील प्रभाग क्र. 11, गोरेवाडा वण येथे सुरक्षा भिंतीची उंची वाढवण्याचे काम करणे अत्यंत गरजेचे असणे, या भिंतीची उंची कमी असल्याकारणाने जंगलातील अन्य प्राणी जसे की बिबट्या, माकड हे लोकवस्तीमध्ये घुसून सामान्यांच्या जनावरांचे पाळीव प्राण्यांचे नुकसान करीत असणे, यामुळे तेथील जनतेमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असणे, या बिबट्याच्या हल्ल्यामध्ये भविष्यात मृत हानी होऊ नये म्हणून या भिंतीची उंची वाढवणे अत्यंत गरजेचे असणे, या भिंती चे बांधकाम करण्यासाठी सुमारे 10 कोटीची तरतूद करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे)** |
| (१४) | ६३९२ | १० | मिरा भाईंदर जिल्हा ठाणे महानगरपालिकेत मोठया प्रमाणात निधीचा गैरव्यवहार व अनियमित्तता होत असून दैनदिन जमाखर्च पाहण्यासाठी शासनाकडून प्रभारी मुख्य लेखापरीक्षकांची नियमानुसार नियुक्ती करूनही मागील चार वर्षापासून लेखापरिषण करण्यात आले नाही. तसेच शासनाकडे सुध्दा पाठविलेले नाही. हे लेखा परिक्षण न करण्यासाठी कोव्हीडचे कारण देऊन हात झटकण्याचे प्रकार तेथील अधिकारी करित आहे. तत्कालीन आयुक्त तथा प्रशासक यांनी विनापरवाणगीने माहे जानेवारी २०२३ मध्ये आग सुरक्षा राखीव निधी आणि निवृत्त वेतन राखीव निधीतून ६० कोटी अन्य ठिकाणी वळविण्यात आले. तसेच निविदा पडताळनी समितीने अन्य ११ निविदा प्रक्रियेत नियमाचे उल्लघंन झाले असल्याने ते रदद करण्याची शिफारस केली असतांना सुध्दा भ्रष्ट अध्किाऱ्यांनी याबाबत कोणतीच कार्यवाही न करता निविदा प्रक्रिया राबविलेली आहे. तसेच उदयान देखभाल व निगा |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | निविदाप्रक्रियेतील मंजूरी व कोराना काळात रूग्णवाहिकेत निविदा प्रक्रिया न राबविता मंजूर दरापेक्षा जास्त दामदुप्पटीने आय.सी.यु.वातानुकुलीत रूग्णवाहिका स्वमर्जीतील लोकांना कामे दिल्याने यासर्व कामात मोठया प्रमाणात गैरप्रकार करून कंत्राटदाराला लाभ पोहचवून शासनाचे लाखो रूपयांचे नुकसान केले आहे. या गंभीर प्रकरणाची लेखी तक्रार शासनाकडे करण्यात आलेली असतांना सुध्दा अघापही चौकशी न करता संबधित अधिकारी व क्रत्राटदार यांना पाठीशी घालण्याचे काम सुरू असल्यामुळे नागरिकात पसरत असलेले तीव्र असंतोष व संतापाचे वातावरण परिणामी उपरोक्त प्रकरणी वरिष्ठ अधिकाऱ्यामार्फतीने सखोल चौकशी करून संबधितावर कार्यवाही होण्यासाठी शासनाने करावयाची कार्यवाही व उपायायोजना. |
| | | | **श्री. सुभाष धोटे** |
| (१५) | ६३८६ | १० | मिरा भाईंदर जिल्हा ठाणे महानगरपालिकेत मोठया प्रमाणात निधीचा गैरव्यवहार व अनियमित्तत्ता होत असून दैनदिन जमाखर्च पाहण्यासाठी शासनाकडून प्रभारी मुख्य लेखापरीक्षकांची नियमानुसार नियुक्ती करूनही मागील चार वर्षापासून लेखापरिषण करण्यात आले नाही. तसेच शासनाकडे सुध्दा पाठविलेले नाही. हे लेखा परिक्षण न करण्यासाठी कोव्हीडचे कारण देऊन हात झटकण्याचे प्रकार तेथील अधिकारी करित आहे. तत्कालीन आयुक्त तथा प्रशासक यांनी विनापरवाणगीने माहे जानेवारी २०२३ मध्ये आग सुरक्षा राखीव निधी आणि निवृत्त वेतन राखीव निधीतून ६० कोटी अन्य ठिकाणी वळविण्यात आले. तसेच निविदा पडताळनी समितीने अन्य ११ निविदा प्रक्रियेत नियमाचे उल्लघंन झाले असल्याने ते रदद करण्याची शिफारस केली असतांना सुध्दा भ्रष्ट अध्किाऱ्यांनी याबाबत कोणतीच कार्यवाही न करता निविदा प्रक्रिया राबविलेली आहे. तसेच उदयान देखभाल व निगा निविदाप्रक्रियेतील मंजूरी व कोराना काळात रूग्णवाहिकेत निविदा प्रक्रिया न राबविता मंजूर दरापेक्षा जास्त दामदुप्पटीने आय.सी.यु.वातानुकुलीत रूग्णवाहिका स्वमर्जीतील लोकांना कामे दिल्याने यासर्व कामात मोठया प्रमाणात गैरप्रकार करून कंत्राटदाराला लाभ पोहचवून शासनाचे लाखो रूपयांचे नुकसान केले आहे. या गंभीर प्रकरणाची लेखी तक्रार शासनाकडे करण्यात आलेली असतांना सुध्दा अघापही चौकशी न करता संबधित अधिकारी व क्रत्राटदार यांना पाठीशी घालण्याचे काम सुरू असल्यामुळे नागरिकात पसरत असलेले तीव्र असंतोष व संतापाचे वातावरण परिणामी उपरोक्त प्रकरणी वरिष्ठ अधिकाऱ्यामार्फतीने सखोल चौकशी करून संबधितावर कार्यवाही होण्यासाठी शासनाने करावयाची कार्यवाही व उपायायोजना. |
| | | | **श्री. विनोद निकोले** |
| (१६) | ६३३८ | १०० | पालघर जिल्ह्यातील डहाणू नगरपरिषद हद्दीतील किमान 100 वर्षे, 80 वर्षे, 60 वर्षे 40 वर्षे जुनी घरे असून हा ऐतिहासिक वारसा जतन करण्याची गरज असतानाही नगर पालिका प्रशासन या घरांना अनधिकृत बांधकाम ठरवून तोडण्याची कारवाई |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | करत असल्याने जनतेत मोठ्या प्रमाणात नाराजी निर्माण झालेली असणे, त्याचबरोबर जुनी घरे तोडू नये असे निर्देश महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाच्या मंत्रालयाने दिलेल्या असताना देखील मुख्याधिकारी यांनी केलेली कारवाई बेकायदेशीर ठरत असणे, म्हणून येथील घर मालकांनी व लोकप्रतिनिधींनी केलेल्या मागणी नुसार व शासने दिलेल्या निदर्शानानुसार सदर घरे न तोडता ती कायम स्वरूपी टिकवून हा ऐतिहासिक वारसा जतन करण्यात यावीत अशी मागणी केली असणे, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. अमिन पटेल** |
| (१७) | ६४६९ | १० | दक्षिण मुंबईतील विशेषतः उमरखाडी, कामाठीपुरा, पायधुनी, भुलेश्वर, नळबाजार, काळबादेवी, मोहम्मद अली रोड व लगतच्या परिसरातील अनेक इमारती या अतिशय जुन्या व जीर्ण झाल्या असल्याने या भागात दरवर्षी दुर्घटना घडून अनेक लोकांचे मृत्यू होत असणे, प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे येथील अनेक जुन्या इमारतीत बेकायदा बांधकामे हे दुर्घटनांचे एक कारण असणे, यामुळे शासनाने येथील इमारतींचे सर्वेक्षण करून व बेकायदा बांधकामे तपासून येथील जुन्या इमारतींचा पुनर्विकास करण्याची गरज निर्माण झालेली असतानाही याप्रकरणी शासनाकडून मोडकळीस आलेल्या इमारतींचा पुनर्विकास करण्यास होत असलेला विलंब, परिणामी येथील जुन्या इमारतींमधील रहिवाश्यांमध्ये पसरलेले असंतोषाचे वातावरण व नाराजीची भावना, त्यामुळे शासनाने येथील संभाव्य दुर्घटना टाळण्यासाठी तातडीने पुनर्विकास करण्याबाबत करावयाची कार्यवाही व उपाययोजना . |
| (१८) | ६४८० | १० | मुंबईमध्ये अनेक विभागात सतत वाहतूक कोंडी होत असणे, वाहनांची संख्या वाढत असल्याने वाहनतळ अपुरी पडत असणे, खास करून मुंबादेवी विधानसभा क्षेत्रात सतत गजबज असणे, वाहनकोंडीमुळे वाहनचालक तसेच नागरिक त्रस्त असणे, अशा वाहनकोंडीमध्ये रुग्णवाहिका अडकल्याने रुग्णांना देखील वेळेत उपचार मिळण्यासाठी विलंब होत असणे, वाहतूक कोंडीमुळे अनेकदा अपघात होंत असणे, वर्दळ आणि वाहनकोंडीमुळे ध्वनी प्रदूषण देखील मोठ्या प्रमाणात होत असल्याचे निदर्शनास येणे, स्थानिक नागरीकांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागत असणे, परिणामी नागरिकांमध्ये पसरलेले असंतोषाचे वातावरण, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. नानाभाऊ पटोले** |
| (१९) | ६४६५ | १० | भंडारा जिल्ह्यात साकोली नगर परिषदेला स्वतंत्र प्रशासकीय ईमारत नसणे, नगरपरिषद साकोली व नगरपंचायत लाखनी व लाखांदूर शहरातील कव्हरसहीत गटाऱ्यांचे बांधकाम नसणे, शहरात स्वतंत्र पाणी पुरवठा योजना नसणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | **श्री. सुनिल प्रभू** |
| (२०) | ६४२४ | १० | जि.नाशिक, ता.मालेगांव येथील मौजे संगमेश्वर येथील सर्व्हे क्र.238/1ते5, न.भू.क्र.96-100 या एकत्रित दोन एकराच्या भूखंडावर संभाजी अहिर व कमलाकर पवार या जमीन मालकांनी मालेगांव महानगरपालिकेच्या आयुक्तांसमवेत आर्थिक संगनमत व बेकायदा प्लान मंजूर करुन तीन मजली व्यावसायीक इमारतीचे बांधकाम करुन प्रती गाळा ४० लाख रुपये प्रमाणे १५६ गाळयांची विक्री करुन कोट्यावधी रुपयाचा आर्थिक गैरव्यवहार करण्यात येणे, गेली ५० वर्षापासून उक्त भूखंडावर वास्तव्य करणाऱ्या ५० कब्जेदार अनिवासी कुटुंबांनी पालिकेस व मालकास नियमित भाडे व देय रक्कम अदा केली असतानाही सदरहू भाडेकरु कुटुंबियांना नविन इमारतीच्या मंजूर प्लानमधील व्यापारी गाळे देण्याची तरतुद न करता, सदरहू भाडेकरु कुटुंबांना बेघर व बेदखल करण्यात येणे, उक्त प्रकरणी कब्जेदार भाडेकरुंनी माननीय नगरविकास मंत्री महोदयाकडे केलेल्या तक्रारीवर मंत्री महोदयांनी सुनावनीत एमआरटीपी अँक्ट 1966 चे कलम 47 अन्वये दि.23.11.2015 रोजी दिलेल्या निर्णयात महापालिकेने कब्जेदार भाडेकरु वापरत असलेले न्यायप्रविष्ठ क्षेत्र बांधकाम प्रकल्पातून वगळून उर्वरित क्षेत्रावर बांधकाम करण्याचे आदेश दिले असतानाही अद्याप ससदरहू मंत्री महोदयांच्या आदेशाची महापालिका आयुक्तांनी पालन करुन ५० कब्जेदार भाडेकरुंना न्याय न देता त्यांच्यावर अन्याय करणे, उक्त प्रकरणी शासनाने सखोल चौकशी करुन त्यानुसार ५० वर्षे वास्तव्य करणाऱ्या ५० कब्जेदार भाडेकरुंना न्याय देण्याच्यादृष्टीने शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (२१) | ६४३१ | १० | “मुंबई, मालाड (पूर्व), दिंडोशी विधानसभा क्षेत्रात अनेक ठिकाणी डोंगराळ भाग असून पावसाळ्यात दरडी कोसळण्याच्या होत असलेल्या दुर्घटना थांबविण्यासाठी अस्तित्वात असलेल्या संरक्षक भिंतीचे दरवर्षी नुकसान होत असल्यामुळे सदरहू संरक्षक भिंतीच्या कामाकरिता निधी उपलब्ध करुन देणेबाबत शासनाकडे अनेक वेळा स्थानिक लोकप्रतिनिधींनी मागणी करुनही अद्याप निधी उपलब्ध करुन दिला नसल्याची बाब नुकतीच निदर्शनास येणे, राज्य शासनाच्या जिल्हा नियोजन अधिकारी यांचेतर्फे संरक्षक भिंतीच्या कामासाठी सन २०२२-२३ या वर्षात २५ प्रशासकीय कामांसाठी ६१५ लक्ष निधी मंजूर करण्यात येऊनही प्रत्येक्षात संरक्षक भिंतीच्या बांधकामासाठी एक पैसाही निधी उपलब्ध करुन देण्यात न येणे, संरक्षक भिंतीच्या बांधकामासाठी शासनाने निधी उपलब्ध करुन न दिल्यामुळे सदरहू नादुरुस्त संरक्षक भिंतीवर दरड कोसळून जिवीत व वित्त हानी होण्याचा निर्माण झालेला गंभीर धोका, यासंदर्भात नगर विकास मंत्री महोदय, आयुक्त-मुंबई महानगरपालिका यांना अनेक वेळा लेखी निवेदन देऊनही अद्याप यावर शासनाकडून कोणतीच कार्यवाही करण्यात न येणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| (२२) | ६४३२ | १० | "मुंबई पश्चिम उपनगरातील मालाड (पूर्व) न.भू.क्र.८२७ड/४ उक्त महापालिकेचा २७४९ चौ.मी. क्षेत्रफळाचा राखीव असलेला भूखंड पालिकेच्या पी-उत्तर विभागाकडे दि.७.१२.२०१२ रोजी हस्तांतर करण्यात येऊनही यावर प्रसुतीगृह व एनआयसीयू उभारण्याकरिता व्यवहार्य बाबतचा अहवाल प्रशासकीय मंजूरी, निधी उपलब्ध करणे व अंदाजपत्रक निविदा करणेबाबतची कार्यवाही वास्तुशास्त्रज्ञ प्रमुख अभियंता व आरोग्य पायाभूत सुविधा कक्ष या विभागाच्या संबंधित अधिकाऱ्यांनी अद्याप यावर कोणतीच कार्यवाही केली नसल्याचे नुकतेच निदर्शनास येणे, तसेच क्रांतीनगरमधील उंच भागावर असलेल्या गणेशचाळीतील रहिवाश्यांना पाणीपुरवठा सुधारणा करण्याकरिता पंपींगची सर्व प्रकारची कामे पूर्ण करण्यात आलेली असताना देखील जलवाहीनी व उदंचन केंद्रांच्या प्रस्तावीस कामास मंजूरी साठी प्रलंबित तसेच गोकूळ नगर, क्रांती नगर शिवसेना शाखा ते संदिप हॉटेल गोकूळ नगर पर्यंत १५० मि.मी. व्यासाची ३५० मीटर लांब जलवाहीनीच्या मंजूर झालेले प्रस्तावाची पुढील कार्यवाही सुरु करणेबाबतकार्यकारी अभियंता (जलकामे पश्चिम उपनगरे) यांच्याकडे प्रलंबित असणे, सदरहू प्रलंबित कामे तातडीने करणेबाबत लोकप्रतिनिधींनी दि.१७ जानेवारी २०२३ रोजीच्या पालकमंत्र्यांसोबत झालेल्या बैठकीत मागणी करुनही अद्याप याबाबत शासनाने कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसणे, सदरहू कामा अभावी येथील स्थानिक रहिवाशी कुटुंबांची पाण्यासाठी झालेली व होत असलेली प्रचंड गैरसोय, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (२३) | ६४३३ | १० | मुंबईतील मालाड (पूर्व) येथील मागाठाणे-महिंद्रा एण्ड महिंद्रा कंपनी - लोखंडवाला - क्रांतीनगर - आप्पापाडा-जलाशय मार्ग मुलुंड-लिंक रोडकडे जाणारा १२० फूट रुंद विकास नियोजीत रस्त्याच्याविकास कामास कामाचे कार्यादेश प्रमुख अभियंता (रस्ते) यांनी दिले असून पर्यावरण विभागाची परवानगी घेणे, सदर रस्त्याचे टोटल स्टेशन प्लान तयार करुन सहाय्यक आयुक्त पी-उत्तर यांना सादर करण्यात आलेले असून विकास नियोजन रस्त्यात बाधीत होणाऱ्या भूखंडाचा ताबा महापालिकेला देणेकरिता उप अधिक्षक (वने) तसेच जिल्हाधिकारी मुंबई, उपनगरे यांनी अद्यापपर्यंत कोणतीच कार्यवाही केलेली नसणे, तसेच सदरहू रस्त्याच्या विकास कामासाठी प्रमुख अभियंता (रस्ते) व सहाय्यक आयुक्त, पी-उत्तर यांनी कोणतीच कार्यवाही न केल्यामुळे सदरहू रस्त्याचे बांधकाम अद्याप प्रलंबित असणे, कामासाठी आवश्यक निधीची तरतदु करणेबाबत कोणतीच कार्यवाही केलेली नसणे, तसेच कुरारगांव, लक्ष्मण नगर येथील संस्कार कॉलेज १८.३० मीटर रुंदीच्या रस्ता रुंदीकरणाच्या विकास कामास बाधित १७८ झोपडीधारकांना महापालिकेतर्फे एमएमआरडीए व मेट्रो प्राधिकरणातर्फे पीएपी सदनिका वितरीत करण्यासाठी शासनाची मान्यता घेणेबाबत अद्याप कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्याने सदरहू प्रस्तावित विकास नियोजन रस्ता वाहतुकीसाठी खुला होऊ न शकल्याने येथील वाहतुक कोंडीची समस्या द्याप कायम असल्याने येथील जनतेची होत असलेली गैरसोय, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| (२४) | ६४३७ | १० | मुंबईतील विले पार्ले (पूर्व) स्टेशन समोर, रेल्वे स्थानका समोर मुंबई महानगरपालिका व एमएमआरडीए प्राधिकरणातर्फे कॅप्टन तेजपाल मार्गावर बांधण्यात आलेल्या कॅप्टन विनायक गोरे या पुर्व-पश्चिम उड्डाण पुल व मिलन सबवेचा सुभाष रोड या हायवेला जोडणारा रस्त्यावर मोठ्या प्रमाणात वाहतुक कोंडी होऊन वाहतुक ठप्प होऊन वाहन चालक व जनतेची प्रचंड गैरसोय होत असल्याचा प्रकार दि.12.6.2024 रोजी निदर्शनास येणे, सदरहु ठिकाणी मुंबई महापालिकेतर्फे रुंदीकरणाची संथगतीने सुरु असलेली कामे आणि विशेष करुन सायंकाळी पिक हावर्सच्या वेळी वाहतुक ठप्प होऊन वाहन चालक व प्रवासी जनतेस तासन तास ट्राफीकमध्ये अडकुन रहावे लागल्याने वेळेचा व इंधनाचे मोठ्या प्रमाणात झालेले व अद्यापही होत असलेले आर्थिक नुकसान व प्रचंड गैरसोय, मुंबई महापालिका प्रशासनाच्या योग्य नियोजन व रस्ता रुंदीकरणाची अपुर्ण कामे पुर्ण न करता अर्धवट अवस्थेत प्रलंबित ठेवण्यात येणे,तसेच शासनाच्या नगरविकास व परिवहन विभागाचे अधिकारी यांचे अयोग्य नियोजन व समन्वया अभावी या परिसरातील लाखो जनतेची गैरसोय होऊन मनःस्ताप सहन करावा लागणे,याकडे झालेले शासनाचे झालेले अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने कार्यवाही व उपाययोजना. |
| (२५) | ६४३९ | १० | “मुंबई महापालिका प्रशासनाने शहर व उपनगरातील रस्ते खड्डेमुक्त करण्यासाठी गेले दोन वर्षात 725 कोटी रुपये खर्च करुनही शहरातील रस्त्यावर खड्ड्यांची स्थिती जैसे थे असल्याचा प्रकार दि.11.6.2024 रोजी निदर्शनास येणे, पालिका प्रशासनाने मुंबईतील सर्व रस्ते कॉक्रिंटीकरण करण्याचा निर्णय घेण्यात येणे, यापैकी आतापर्यंत शहरात 24 ठिकाणी, पूर्व उपनगरात 32 ठिकाणी तर पश्चिम उपनगरात 87 ठिकाणी सिमेंट कांक्रिंटीकरंणाची कामे सुरु असुन यापैकी आतापर्यंत केवळ 30% रस्त्यांची कामे पुर्ण करण्यात येणे, यामुळे उर्वरित सिमेंट कॉक्रिंटीकरणाचे काम न झालेल्या 70 %रस्त्यावर असंख्य खड्डे पडल्याने मुंबईकर जनता आणि वाहन मालक चालक यांची रहदारीसाठी वाहतुक कोंडी, खड्डेमुक्त रस्ते कामासाठी सुमारे 725 कोटी रुपये इतका निधी खर्च करुनही रस्त्यावर खड्डे पडतच असल्याने शासन तथा महापालिकेचे कोट्यावधी रुपये निधीचे आर्थिक नुकसान होऊन शासकीय निधीचा झालेला अपव्यय, दोन वर्षात मुबंईत केवळ खड्डेमुक्त रस्त्यासाठी 725 कोटी रुपये खर्च करण्यात येऊनही मुंबईतील रस्ते मोठ्या प्रमाणात असल्याचे आढळुन येणे, याबाबत शासनाने कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. अस्लम शेख** |
| (२६) | ६२९६ | १० | मुंबई उपनगरातील मालाड पश्चिम मार्वे रोड या रस्त्याचे रुंदीकरणाचे काम गत अनेक वर्षापासून सुरु असणे, रुंदीकरणाचे काम मंद गतीने सुरु असणे, मार्वे टी जंक्शन ते मढ गावापर्यंत रस्ता रुंदी करणाच्या कामास सुरुवात झाली नसणे, मार्वे टी जंक्शन ते मढ पर्यंत रस्ता अरुंद असणे, त्या ठिकाणी प्रचंड वाहतूक कोंडी निर्माण होत असणे, त्यामुळे वायू व ध्वनी प्रदूषण निर्माण होत असणे, वायू व धूळ |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | प्रदूषणामुळे फुफ्फुसाचे आजार होत असणे, स्थानिकांच्या आरोग्यास धोका निर्माण झाला असणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (२७) | ६२९७ | १० | मालवणी गेट क्र.८, मालवणी बेस्ट आगाराजवळ मालाड (पश्चिम) मुंबई येथील एम.एच.बी. इंग्रजी व उर्दू म.न.पा. शाळा क्र.३ या शाळेच्या पुनर्बांधीचे काम संथगतीने सुरु असणे, म्हाडाच्या भूखंडाचा विकास करावयाचा झाल्यास त्यासाठी म्हाडाच्या ना हरकत प्रमाण पत्राची आवश्यकता निर्माण झाली असणे, म्हाडाने ना हरकत प्रमाणपत्र दिले असणे, मात्र म.न.पा.ने काम उशीराने सुरु केले असणे, शाळेच्या इमारतीचे बांधकाम पूर्ण झाले नसणे, त्यामुळे विद्यार्थ्यांना शिक्षणापासून वंचित रहावे लागत असणे, विद्यार्थी व पालक यांची गैरसोय दूर करण्याची अवश्यकता निर्माण झाली असणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (२८) | ६२९८ | १० | अंबोजवाडी, मालवणी, मालाड (पश्चिम), मुंबई येथील जमिनीचा सर्वे क्रमांक 263 (भाग) सी.टी.एस नंबर 3554 (भाग) असून सदरच्या जागेवर शासनाने दफनभूमीचे आरक्षण ठेवले असणे, त्या जागेवर सुन्नी व शिया मुस्लिम दफनभूमी करण्यात यावी अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी व स्थानिक रहिवाशांनी जिल्हाधिकारी मुंबई उपनगर, पालिका आयुक्त व प्रमुख अभियंता (डी.पी) बृहन्मुंबई महानगरपालिका यांच्याकडे वारंवार केली असणे, तरीही शासनाने त्याकडे केलेले अक्षम्य दुर्लक्ष, दफनभूमी करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (२९) | ६२९९ | १० | मालवणी, मालाड (पश्चिम) मुंबई येथे महानगरपालिकेचे मलनि:स्सारण सांडपाणी प्रक्रिया केंद्र असून मे मॉट मॅकडोनाल्ड कन्सेर्शियम या सल्लागार कंपनीने अभ्यास करुन बृहन्मुंबई मलनि:स्सारण प्रकल्प टप्पा-२ चा मास्टर प्लॅन तयार करुन ४५४ द.ल.प्रतिदिन क्षमतेची अद्यावत द्वितीय/तृतीय स्तरीय प्रक्रिया केंद्र उभारण्याकरीता मलजल प्रक्रिया केंद्र प्रस्तावित केले असणे, केंद्र व राज्य शासनाच्या सर्व विभागाच्या परवानग्या मिळाल्या असणे, तथापि महानगरपालिकेने टप्पा-२ चे काम सुरु केले नसणे, म.न.पा.ने निवदेमध्ये अनेकवेळा पडताळणी व बदल केले असणे तरीही निविदेचे काम पूर्ण झाले नसणे, म.न.पा.चे संबंधित वरिष्ठ अधिकारी निविदेचे काम पूर्ण करीत नसणे, मल:निस्सारण सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प टप्पा-२ चे काम तातडीने सुरु करण्याची आवश्यकता निर्माण झाली असणे, याकडे शासनाने केलेले अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (३०) | ६३०० | १० | मुंबई उपनगरातील मालाड (पश्चिम) येथील इनफिनिटी मॉल (Back Road) ते लगून रोड येथील नाल्यावर पूल बांधला नसणे, नाल्यावर पुल बांधण्याची आवश्यकता निर्माण झाली असणे, सदरचा रस्ता फोडण्यासाठी त्याठिकाणी पूल बांधणेसाठी शासनाने ना हरकत प्रमाण पत्र अद्याप दिले नसणे, शासनाकडून पूल बांधण्यासाठी ना हरकत प्रमाण पत्राची गरज असणे, सी.आर. झेड व वन विभागाने |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | अद्याप ना हरकत प्रमाणपत्र दिले नसणे, पूला अभावी स्थानिक नागरीकांची गैरसोय होत असणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (३१) | ६३०१ | १० | मुंबई उपनगरातील मालाड (पश्चिम) मालवणी गेट नं.८ येथील लगून रोड ते अब्दुल हमीद मार्ग या रस्त्याचे १८.३० मीटर रुंदीकरण करणे व विकास करण्याची आवश्यकता निर्माण झाली असणे, महानगरपालिकेने सर्व्हे व सिमांकन केले असणे, रस्त्याच्या रुंदीकरणात ४३१ बांधकामे बाधीत असणे, बाधीतांच्या कागदपत्राची पात्रता निश्चित केली नसणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (३२) | ६३०२ | १० | मुंबई उपनगरातील मालाड (पश्चिम) येथील एस.व्ही.रोडचे रुंदीकरण करण्याचे काम पूर्ण झाले असणे, चिंचोळी बंदर, जमातुल मुस्लिमीन ट्रस्ट, दर्गाह हजरत मख्दुम शाह व दर्गा मस्तान शाह व मस्जिद कंपाउंड येथील रस्ता रूंदीकरण पुर्ण झाले असणे, रस्ता रुंदीकरणावेळी बीएमसीने जुने आणि पात्र 12 दुकाने व 2 घरे पाडली असणे, मात्र बांधितांना पर्यायी जागा दिली गेली नसणे, बांधितांचे पुनर्वसन करण्याची आवश्यकता निर्माण झाली असणे, हा प्रश्न प्रलंबित असणे, संबंधित अधिकरी याकडे जाणीपूर्वक दुर्लक्ष करीत असणे, त्यामुळे स्थानिक नागरिकांमध्ये निर्माण झालेला तीव्र असंतोष, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (३३) | ६३०३ | १० | मनोरी ते मार्वे,मालड (पश्चिम) मुंबई येथे पुल बांधण्याचे गत अनेक वर्षापासून शासनाच्या विचाराधीन असणे, सदरच्या पुलावर पिण्याच्या पाण्याची लाईन टाकण्याची गरज निर्माण झाली असणे, पुला अभावी स्थानिक नागरिकांची गैरसोय होत असणे, या संदर्भात मा. सह आयुक्त परिमंडळ-4, म.ना. पा मुंबई यांच्याकडे अनेक बैठका झाल्या असणे, मात्र म.न.पाच्या संबंधित अधिका-यांने याकडे दुर्लक्ष केले असणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (३४) | ६३०४ | १० | मौजे धारवली, मढ रोड, मालाड (पश्चिम), मुंबई येथे मार्वे - मढ रोडवर पुल असून सदरचा पूल 70 वर्षापूर्वीचा असणे, त्याठिकाणी नवीन पुल बांधण्याची आवश्यकाता निर्माण झाली असणे, तसच सदरच्या पुलावरुन पिण्याच्या पाण्याची लाईन टाकण्याची निकड निर्माण झाली असणे, या संदर्भात स्थानिक लोप्रतिनिधीने मा. उप आयुक्त (परिमंडळ-4) म.न.पा., मुंबई यांच्याकडे दि. 6 जुन,2023 रोजी वा त्यासुमारास मागणी केली असणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (३५) | ६३०५ | १० | मार्वे समूद्र किनारी, मालाड पश्चिम, मुंबई या ठिकाणी नवे बीकेसी उभारण्याचा निर्णय शासनाने घेतला असणे, त्यासाठी विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून मुंबई प्रदेश विकासपा्धिकरण नेमण्याचा प्रस्ताव माहे डिसे. 2023 पासून शासनाकडे प्रलंबित असणे, त्याचा अद्याप निर्णय झाला नसणे, मुंबई प्रदेश प्राधिकरण नेमण्याची आवश्यकता निर्माण झाली असणे, शासनाने 36 हजार 500 एकर |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | जागेवर नविन बीकेसीचा प्रारुप आराखडा तयार करण्याची गरज निर्माण झाली असणे, परिणामी विकासास अडथळा निर्माण होत असणे, व्यवसायीक संकुले उभारणे, चित्रपट निर्मितीसाठी फिल्म सिटी उभारणे, उद्याने, मिनी थिएटर, मनोरंजन केंद्र उभारणे व विकास करणे याकडे शासनाने केलेले अक्षम्य दुर्लक्ष परिणामी स्थानिक नागरिकांमध्ये निर्माण झालेला असंतोष, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **मागणी क्रमांक: एफ-३**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २२३०, कामगार, सेवायोजन व कौशल्य विकास**<br>**रूपये:- १,२९,६१,४७,०००/-**<br>**श्री. विनोद निकोले** |
| (३६) | ६४४५ | १०० | राज्यात शासन निर्णय दि. 2 जानेवारी 1992 अन्वये जाहीर केलेल्या खरेदी धोरणानुसार शासनाच्या वेगवेगळया विभागासाठी आवश्यक त्या वेगवेगळया वस्तूची खरेदी करताना ती विहित पद्धतीचा अवलंब करून मूळ उत्पादकांकडूनच खरेदी करावी असे नियम असणे, त्याअनुषंगाने सदर खरेदीधोरणातील ‘परिशिष्ट अकरा’ प्रमाणे लघु उद्योजकांसाठी 241 वस्तू आरक्षित देखील करण्यात आलेल्या होत्या आणि ह्या वस्तू त्या त्या लघु उद्योजक उत्पादकांकडून खरेदी करण्याचे बंधनही घालण्यात आलेले होते त्यामुळे संबंधित उत्पादकाने संबंधित वस्तूंचा पुरवठा करण्यासाठी अधिकृत प्रतिनिधी/विक्रेते नेमलेले असले तरी देखील खरेदी आदेश मात्र त्या मूळ उत्पादक संस्थेच्या/कंपनीच्या नावानेच दिले जायचे. तद्नंतर शासनाने शासन निर्णय दि. 1 डिसेंबर 2016 अन्वये नवीन खरेदी धोरण जाहीर केले आहे सदर नवीन खरेदी धोरणा नुसार “निविदाकार” आणि “संभाव्य निविदाकार” यांच्या व्याख्या विहित करून त्यात खालील प्रमाणे तरतूद करण्यात आलेली असणे, “निविदाकार” म्हणजे निविदा सादर करणारी व्यक्ति, जिच्याबरोबर खरेदी प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर करार करता येईल व व्यक्ति मध्ये कोणताही व्यक्ति (जी संस्था/फर्म याच्याशी संबंधित असेल), खरेदी मध्ये खरेदीदार यांच्या वतीने भाग घेणे, “संभाव्य निविदाकार” म्हणजे कोणतीही व्यक्ति कंन्सोर्टियमसह (म्हणजे अनेक व्यक्ति किंवा फर्म्स किंवा कंपन्या यांचा संघ) निविदाकार होण्याची शक्यता असणे, वरील प्रमाणे “निविदाकार” आणि “संभाव्य निविदाकार” च्या व्याख्येत केलेल्या तरतुदीचा गैरफायदा घेऊन अनेक शासकीय विभाग हे व्यक्तीकडून (दलालाकडून) तथा व्यक्तींच्या समूहाकडून (दलालाच्या समूहाकडून) निविदा मागवतात आणि त्यांना खरेदी आदेश देतात, वास्तविक पाहता या व्यक्तींचा (दलालाचा) तथा व्यक्ति समूहाचा (दलालाच्या समूहाचा) उत्पादनाशी तथा संबधित वस्तू उत्पादन करणाऱ्या संस्थेशी / कंपनीशी कोणताही संबंध नसणे, या दलालांचे संबंधित शासकीय विभागाशी लागेबांध असल्याने ते मूळ उत्पादक तथा संस्था समोर येणारच नाही किंवा निविदा प्रक्रियेत भाग घेणार नाही याची पूर्ण व्यवस्था करणे, हे दलाल खरेदी आदेश मिळवून उत्पादका कडून मजुरीवर काम (Job work) करून घेतात आणि पूर्ण मलिदा/नफा हे दलाल खाणे, निविदा |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | भरताना / दाखल करताना हे दलाल त्यांचा नफा विचारात घेऊनच संबंधित वस्तूची किंमत निविदेत नमूद करतात त्यामुळे शासनाचे देखील नुकसान होणे, या दलालांचा एक मोठा ग्रुप आहे ते सगळे एकत्रित विचार करून निविदा व त्यातील किमती भरतात आणि काम मिळवतात आणि सर्व मिळून नफा लाटणे, सदर वस्तुस्थिती विचारात घेता शासनाच्या या सन 2016 च्या खरेदी धोरणाचा मूळ उत्पादकांना कोणताही फायदा होत नाही उलट त्यांची या दलालाकडून मोठ्या प्रमाणावर पिळवणूक केली जाते हे दिसून येणे, आणि जर शासनाच्या संबंधित खरेदीदार विभागाने मूळ उत्पादक संस्था कडून निविदा मागवून मूळ उत्पादक संस्थेच्या नावाने खरेदी आदेश दिले तर उत्पादक संस्थेच्या पिळवणूकीचा प्रश्नच शिल्लकच राहणार नाही त्यामुळे शासनाने याची तातडीने दखल घेवून वर नमूद केल्याप्रमाणे खरेदी प्रक्रियेतील दलाल कमी करण्याच्या दृष्टीने वरील “निविदाकार” आणि “संभाव्य निविदाकार” च्या व्याख्येत तात्काळ सुधारणा करावी आणि खरेदीदार शासकीय विभागाने विहित पद्धतीचा अवलंब करून केवळ आणि केवळ मूळ उत्पादक संस्थेकडूनच वस्तूंची खरेदी करण्याच्या दृष्टीने केवळ मुळ उत्पादक संस्था/कंपनी यांचेकडूनच निविदा मागवाव्यात आणि उत्पादक संस्थेच्या नावे खरेदी आदेश द्यावेत अशी स्पष्ट तरतूद व्याख्येत तथा खरेदी धोरणात करावी जेणेकरून उत्पादकांवर तथा उत्पादक संस्थांवर अन्याय होणार नाही आणि त्यांची पिळवणूक थांबेल व त्यांच्या हक्काचा नफा त्यांना मिळेल आणि पर्यायाने महाराष्ट्र राज्यामध्ये उद्योगात तथा लघु उद्योगात वाढ होण्यास मदत होणे, यामुळे राज्यातील कारखाने बंद होऊन सर्व महाराष्ट्राबाहेर घेतल्यामुळे रोजगारावर आणि राज्यातील अर्थव्यवस्थेवर मोठा परिणाम झाला असणे, याबाबत शासनाने करावयची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **मागणी क्रमांक: एफ-३**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २४०६, वनीकरण व वन्यजीवन**<br>**रूपये:- १,२९,६१,४७,०००/-**<br>**श्री. संजय जगताप** |
| (३७) | ६४५९ | १० | मौजे अर्नाळा तालुका वसई येथील सर्वे क्रमांक / हिस्सा क्रमांक 54/अ या जागेच्या सातबारावर गुरचरण अशी नोंदणी असून मिलिंद नामदेव पोगरी व त्यांच्या कुटुंबियांनी अनधिकृत पणे बांधकाम करून अतिक्रमण केल्याची वारंवार तक्रार करूनही तहसील कार्यालय, वसई व वसई विरार शहर महानगरपालिका कार्यालय यांच्याकडून कोणतीच कारवाई न केल्याची बाब माहे जून, 2024 मध्ये उघडकीस येणे, ग्रामपंचायत कार्यालय अर्नाळा ग्रामपंचायत यांनी याबाबत तहसील कार्यालय, वसई तसेच मंडळ अधिकारी आणि सहाय्यक आयुक्त, विशेष नियोजन प्राधिकरण पश्चिम विभाग, वसई विरार महानगरपालिका लेखी तक्रार केली असणे, याबाबत तहसील कार्यालय वसई यांच्याकडून मिलिंद नामदेव पोगरे यांना महाराष्ट्र जमीन महसूल 1966 चे 50 मधील विहित नमुन्यात बजावत मोघम स्वरूपाची कारवाई केली असणे, परिणामी सदरील जागेवरचे अतिक्रमण दिवसान दिवस वाढत असणे, |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | मिलिंद नामदेव पोगरी व त्यांच्या कुटुंबावर कोणत्याच प्रकारचे कारवाई न केल्याने तसेच अनधिकृतपणे केलेल्या बांधकामावर कोणतीच कारवाई न केल्याने दिवसेंदिवस अतिक्रमण वाढत असणे, परिणामी ग्रामस्थांमध्ये पसरलेल्या भीतीचे वातावरण, गुरुचरण नोंदी असलेल्या शासकीय जागेचे झालेले नुकसान, मौजे अर्नाळा तालुका वसई येथील सर्व क्रमांक हिसक क्रमांक 54 /अ या जागेवर केलेल्या अनधिकृत बांधकामावर कारवाई करुन गुरचरण नोंदी असलेली शासनाची जागा गुरांसाठी चरण्यास उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. वैभव नाईक** |
| (३८) | ६३५६ | १०० | मौजे अर्नाळा तालुका वसई येथील सर्वे क्रमांक / हिस्सा क्रमांक 54/अ या जागेच्या सातबारावर गुरचरण अशी नोंदणी असून मिलिंद नामदेव पोगरी व त्यांच्या कुटुंबियांनी अनधिकृत पणे बांधकाम करून अतिक्रमण केल्याची वारंवार तक्रार करूनही तहसील कार्यालय, वसई व वसई विरार शहर महानगरपालिका कार्यालय यांच्याकडून कोणतीच कारवाई न केल्याची बाब माहे जून, 2024 मध्ये उघडकीस येणे, ग्रामपंचायत कार्यालय अर्नाळा ग्रामपंचायत यांनी याबाबत तहसील कार्यालय, वसई तसेच मंडळ अधिकारी आणि सहाय्यक आयुक्त, विशेष नियोजन प्राधिकरण पश्चिम विभाग, वसई विरार महानगरपालिका लेखी तक्रार केली असणे, याबाबत तहसील कार्यालय वसई यांच्याकडून मिलिंद नामदेव पोगरे यांना महाराष्ट्र जमीन महसूल 1966 चे 50 मधील विहित नमुन्यात बजावत मोघम स्वरूपाची कारवाई केली असणे, परिणामी सदरील जागेवरचे अतिक्रमण दिवसान दिवस वाढत असणे, मिलिंद नामदेव पोगरी व त्यांच्या कुटुंबावर कोणत्याच प्रकारचे कारवाई न केल्याने तसेच अनधिकृतपणे केलेल्या बांधकामावर कोणतीच कारवाई न केल्याने दिवसेंदिवस अतिक्रमण वाढत असणे, परिणामी ग्रामस्थांमध्ये पसरलेल्या भीतीचे वातावरण, गुरुचरण नोंदी असलेल्या शासकीय जागेचे झालेले नुकसान, मौजे अर्नाळा तालुका वसई येथील सर्व क्रमांक हिसक क्रमांक 54 /अ या जागेवर केलेल्या अनधिकृत बांधकामावर कारवाई करुन गुरचरण नोंद असलेली शासनाची जागा गुरांसाठी चरण्यास उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **मागणी क्रमांक: एफ-५**<br>**मुख्य लेखाशीर्ष: ४२१७, नगरविकासांवरील भांडवली खर्च**<br>**रूपये:- २२,९४,४२,४६,०००/-**<br>**श्री. सुभाष धोटे** |
| (३९) | ६३७८ | १० | राजुरा(जिल्हा चंद्रपूर) मतदार संघातील राजुरा नगर परिषदेची स्थापना महाराष्ट्र निर्मितीच्या पूर्वी सन १९५६ मध्ये झाली असून आज जवळपास ७५ वर्ष पुर्ण होत आहे. असे असतांना सुध्दा नगरपरिषदेची स्वतंत्र प्रशासकीय इमारत नसल्यामुळे नगर परिषदचे कार्यालयीन कामकाज जुन्या असलेल्या विश्राम गृहाच्या इमारतीमध्ये |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | सुरु आहे. त्यामुळे कार्यालयीन कामकाजाकरिता अधिकारी व कर्मचारी तसेच दैनंदिन कामकाजाकरिता येणारे नागरिक याना आर्थिक व माणसीक त्रास सहण करावा लागत आहे. या कारणास्तव सदर नगरपरिषद प्रशासकीय इमारत बांधकाम करण्यासाठी वारंवार प्रस्ताव नगरविकास विभागाकडे पाठविण्यात आले असतांना सुध्दा या प्रस्तावास अघापही निधीसह प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली नसल्यामुळे इमारतीचे बांधकाम करण्यात आले नसणे, ७५ वर्ष जुन्या राजूरा नगरपरिषद प्रशासकीय इमारत बांधकाम करण्याबाबतच्या प्रस्तावास मंजूरी मिळण्यासाठी शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |

**विधान भवन**
**मुंबई,**
**दिनांक : ४ जुलै, २०२४**

**जितेंद्र भोळे,**
**सचिव-१ (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानसभा**

**याची प्रत :**

(१) मंत्री व राज्यमंत्री
(२) विधानसभेचे सर्व सदस्य.
(३) नगर विकास विभाग (१० प्रती)
(४) संसदीय कार्य विभाग.
(५) वित्त विभाग.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई